Maharashtra Times, September07, 2014. Pp.6

# शास्त्रज्ञ होण्यासाठी तर प्रश्न पडायला हवेत

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे मत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

तुम्हाला शास्त्रज्ञ का व्हावसे वाटले, तुम्ही केलेल्या संशोधनातील सर्वाधिक आवडलेला शोध कोणता इथेपासून ते सध्याच्या अंतराळ विश्वाशी निगडीत संशोधनापर्यंतचे अनेक प्रश्न चिमुकल्यांनी मोकळेपणाने विचारले अन् नकळत डॉ. जयंत नारळीकर यांच्याबरोबर गप्पांची मैफल रंगत केली.

'यशस्वी शास्त्रज्ञ बनायचे असेल तर मुलांनो तुम्हाला खूप प्रश्न पडले पाहिजेत, आणि त्यांची उत्तरे शोधण्यासाठी तुम्ही मेहनत घेण्याची तयारीही ठेवली पाहिजे,' असा कानमंत्र नारळीकर यांनी या वेळी मुलांना दिला. निमित्त होते अरभाट चिल्ड्रन फिल्म क्लबतर्फे शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या चित्रपट सादरीकरण कार्यक्रमाचे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयामध्ये झालेल्या या कार्यक्रमात सभासदांना 'ऑक्टोबर स्काय' हा चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपट संपल्यानंतर नारळीकर यांनी मुलांशी संवाद साधला. उमेश कुलकर्णी यांनी संयोजन केले.



एवढ्या मोठ्या व्यक्तीला आपण प्रश्न कसे विचाराचे, म्हणून सुरुवातीला खुर्चीत बिचकून बसलेल्या मुलांना नारळीकर यांनी मनमोकळ्या संवादाने बोलते केले. नारळीकरांनी खगोलविश्वाशी निगडित दोन प्रश्न विचारून नंतर मुलांना तुम्हीच प्रश्न विचारा असे आवाहन केले. 'तुम्ही शास्त्रज्ञ कसे झालात,' 'तुम्हाला अभ्यासात सगळ्यात जास्त कोणता विषय आवडत होता,' 'तुम्ही पहिला शोध कोणता लावला,' असे वैविध्यपूर्ण प्रश्न मुलांनी विचारले. एवढेच नव्हे तर मित्रांबरोबर घरामध्ये पालकांच्या नकळत सुरू असलेल्या वेगवेगळ्या प्रयोगांची रहस्यही नारळीकरांसमोर उलगडली.

'सभोवताली जे घडते, त्याविषयी आपल्याला प्रश्न पडले पाहिजेत. कुतूहल निर्माण होणे आवश्यक आहे. त्यामागचे शास्त्र समजून घेण्यासाठीही आपण प्रयत्न केले पाहिजेत,' असे सांगून नारळीकर यांनी संशोधनाच्या विविध टप्प्यांवर आलेले अनुभव कथन केले.